महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
कस्तुरी बिल्डिंग, तळ मजला, जे.टाटा मार्ग,
पेट्रोलियम हाऊस समोर, चर्चगेट, मुंबई-४०००२०.
दुरध्वनी क्रमांक ०२२-२२८८०१०६/०७ ईमेल आयडी - aotransfer२०२५@gmail.com

संदर्भ : १. वित्त विभाग आदेश क्र. संलेको-२०२५/प्र.क्र.६०/कोषा प्रशा-२, दि.३०-०५-२०२५.
२. वित्त विभाग आदेश क्र. संलेको-२०२५/प्र.क्र.६१/कोषा प्रशा-२, दि.३०-०५-२०२५.
३. संचालनालयाचे आदेश क्र. संलेको/प्रशा- राप/स.ब.२०२५/ले.अ./५२२, दि.३०-०५-२०२५.
४. वित्त विभाग पत्र क्र. संलेको-२०२५/प्र.क्र.७८/कोषा (प्रशा-२), दि.०३-०७-२०२५.

---

क्र.संलेको/ प्रशा-राप/ का-२/सर्वसाधारण बदली -२५/रुजू कार्यमुक्त/684 दि. 16 JUL 2025

**विषय: लेखा अधिकारी संवर्ग - बदलीने पदस्थापना दिलेल्या पदावर हजर न झालेल्या अधिकाऱ्यांबाबतची माहिती मागविणेबाबत.**

## -: परिपत्रक :

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी गट ब (राजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांना संदर्भ क्र.१ ते ३ वरील आदेशान्वये प्रशासकीय / विनंती /संवर्ग बदलीने पदस्थापना देण्यात आल्या आहेत. बदलीचे आदेश निर्गमित झाल्यानंतर १ महिन्याचा कालावधी पूर्ण होऊनही काही अधिकारी सद्याच्या पदावरून कार्यमुक्त होऊन अद्यापपर्यंत बदलीच्या पदावर रूजू झालेले नाहीत.

शासन वित्त विभागाच्या संदर्भ क्र.४ वरील पत्रान्वये बदलीने देण्यात आलेल्या पदावर हजर न झालेल्या अधिकाऱ्यांचा आढावा घेऊन तात्काळ त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्यानुषंगाने संदर्भीय आदेशान्वये बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना खालील सक्त सूचना देण्यात येत आहेत :

१. उपरोक्त संदर्भीय आदेशांन्वये बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी तात्काळ बदलीच्या ठिकाणी हजर होवून आपले रुजू अहवाल aotransfer२०२५@gmail.com या ई-मेल वर संचालनालयास सादर करावेत. अन्यथा शासन आदेशाचे पालन होत नसल्यामुळे त्यांचेविरुद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२. संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर आदेश संचालनालयाच्या https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असल्यामुळे सद्यस्थितीत उपरोक्त अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करणे अथवा हजर करून घेण्याबाबत संकेत स्थळावरील प्रत ग्राह्य धरण्यात यावी.

रश्मी नांदिवडेकर
(रश्मी नांदिवडेकर)
सहसंचालक (प्रशासन)
लेखा व कोषागारे, मुंबई.

प्रत अग्रेषित:
१. सहसचिव (कोषा प्रशा.२), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, वांद्रे, मुंबई. .
३. सहसंचालक, लेखा व कोषागारे (सर्व).

४. कोषागार अधिकारी (सर्व).
५. संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याच्या पदावरील नियंत्रक अधिकारी व कार्यालय प्रमुख.
६. संबंधित अधिकाऱ्यांचे  नियुक्तीच्या पदावरील नियंत्रक अधिकारी व कार्यालय प्रमुख.
७. संबंधित अधिकारी.
८. संबधित कर्मचाऱ्यांची वैयक्तिक नस्ती.